म. ग्रं. सं. ठाणे

विषय
काव्य

लेखक रघुनाथ शास्त्री
खाडीलकर

सन
१८८७

संग्रहालय क्रमांक
२०
२०८

पुस्तकाचें नांव गोपीचंद आख्यान
२०८

20

काव्य


गोरक्षनाथ
कानीफा
मैना

ग्रं. क्रमांक ८८८

# गोपीचंद आख्यान प्राकृत.

संग्रहालय
क्रमांक २८०

हें पुस्तक

रघुनाथशास्त्री खाडीलकर

यांनीं

हिंदुस्थानीवरून मराठी भाषांतर

केलें.

आवृत्ती १

## मुकाम मुंबई.

माधवचंद्रोबा यांच्या छापखान्यांत

छापलें.

शके १७८३

खाते सूचीत नोंद नाही
१८।१०।५२

# प्रस्तावना.

हें गोपीचंद आख्यान पूर्वी हिंदुस्थानी भाषेंत होतें त्यावरून बाळकृष्णदास कवी यांणीं आर्याछंदानें भाषांतर केलें तें कितीएक लोकांस दुर्बोध आहे ह्मणून अज्ञान जनांस तें सुबोध व्हावें या हेतूनें रघुनाथ शास्त्री त्वाडीलकर यांणीं केवळ मराठी भाषांतर करून प्रसिद्ध केलें आहे तर हें आख्यान सर्वांनीं कृपा करून याचा स्वीकार करावा म्हणजे इतकी मेहनत केली तीचें सार्थक होईल.

# अथगोपीचंदआख्यानप्राकृत प्रारंभः

बंगाल या देशांत त्रैलोक्यचंद सार्वभौम राजा होता त्याची स्त्री अतिरूपवती होती, त्या राजाचा पुत्र गोपीचंद यानामाचा भोग पुण्य वान् होता त्याचें रूप कसें होतें? मदना सारिखेंच होतें. त्याला स्त्रिया बाराशें होत्या, त्या विवाहित. आणि भोगांगना ह्मणजे भोगस्त्रिया सोळाशें होत्या. आणि त्याची माता मैनावती यानामाची वैराग्याची केवळ स्वामीचहोती, त्या राजाच्या नगरांत जालंदरनाथ साधु रहात असे. ज्याच्या गळ्यांत कंथा आणि सर्वांगीं विभूतीचा लेप असे. कुबडी आणि कमंडलु कृष्णाजिन आधि वेणूवाद्य हें त्याजवळ सदा सार्वकाळ असे. असें कां? गुरूचे संप्र-

दायाप्रमाणे आपण वागत असे. तो सिद्ध
मलीन भूमीवर वास म्हणजे वाईट ठिकाणी
चिखल वगैरे अशाठिकाणी रहात असे. त्या
च्या मनांत असें कीं लोकोपाधीचा त्रास न
व्हावा. तो योगी रानांत जाऊन काष्ठभार घे
ई परंतु तो वरचेवर रहात असे. मग कोणे
एके समयीं हें अद्भुत राजमातेनें पाहून म
नीं विस्मित होऊन तो विचार करून काय म्ह
णाली? हा सामान्य योगी नव्हे. तर हा केवळ
हरीच आहे.

आतां असें करावें कीं याचे चरण ध
रून वेदांतांतील गुह्य वस्तू जी आहे ती या गु
रूपासून प्राप्त होईल असा विचार करून-
मैनावतीनें आपल्या सख्या बराबर घेऊन-
जालंदर योगी याच्या दर्शनाची मनी प्रीती
धरून जालंदर योगी जेथें होता तेथें येऊन-
नाथाचिया पायांवर मस्तक ठेविला. आ

प्रार्थना करितें कीं मजवर कृपाकरून मलाउ पदेशांमृत म्हणजे उपदेश करून सर्व संताप दूर होई असें करावें. मैनावतीप्रत साधु बोलतो कीं उपदेश करण्याचा प्रकार मला कांहींच ठाऊक नाहीं. तरि तूं दर्शन घेऊन आपुल्यागृहीं सुखाने जावें. अशी वाणी ऐकून नाथाचे पाय धरून भावें करून मग बोलली कीं तुला शरण आल्यें आतां माझी उपेक्षा नकरावी.

असा तीचा सद्भाव व अतिनम्रता पाहून तो मस्तकीं हात ठेविता जहाला. मग मंत्र सांगून लवकरच परमेश्वर स्वरूप दाखविता जहाला. अशी तात्काळ दया गुरूची मैनावती वर होती जहाली. मग तिणें सर्व गृहादिक म्हणजे सर्व कारभार सोडून तिला गुरूचे ठिकाणी अभिरूची होती जहाली. मग असल्ये अंतःपुरांत राजा स्त्रियांसहवर्तमान

एकदां आला. त्याकाळीं स्त्रियांनीं विनंती केली कीं आपल्ये फजीतीस कारण जहालें ते काय असें म्हणाल तर आपल्ये नगरांत कोणीएक जालंदर नामाचा जोगी आहे त्याचा उपदेश तुमच्या मातेनें घेऊन त्याचें पूजन करून तेथेंच ती निरंतर रहाते.

असें ऐकून राजा कोपविष्ट होऊन प्रधानास सांगता जहाला कीं जालंदर यानामाचा योगी आहे त्याला आपल्ये गृहास आण. असें राजाचें वचन ऐकून तो प्रधान आणावयास जाऊन पहिल्यानें गुरूचे चरण वंदून असें बोलतो कीं, तुमचें दर्शन व्हावें याकरितां राजानें आपणास लवकर बोलाविलें आहे.

असें प्रधानाचें बोलणें ऐकून त्याजवर योगीराज बोलतो कीं, राजदर्शनाच्या अभिषानें म्हणजे निमित्तानें सर्व दुःख दहेल. असें वदोनी योगीराज सभेमध्ये गेला तेव्हां त्या रा

हून तो राजा मनी संतापयुक्त होऊन गुरु चरणी नमस्कार करिता जहाला. नंतर योगी राजा आशिर्वाद देऊन आपण समाधिस्त होता जहाला त्यानंतर राजानें कूपांत जालंदर यास लोटून स्वस्थ असता जहाला. त्याकाळीं राजमाता शोधकरूं लागली परंतु कोठेही शो ध नाहींलागत असा मनात विचार करून फा रफार शोक करिती जहाली. जो भेटेल त्यास पुसूं लागली, परंतु शोध कोठेंहीं नाहीं. सर्व चित्तवृत्ती गुरुचरणी स्थीर असती जाहाली.

इतिश्री गोपीचंद आख्यानें प्रथमोध्यायः

कोणेंएके दिवशीं राजा चंदन चौकीवर स्नानास बसता जहाला त्यावेळीं नानाप्रका रचीं सुगंध तेलें स्त्रिया आंगीं लाविनात ते व्हां राजमाता आपल्ये पुत्राच्ये सुंदर गृहामध्यें म[illegible]वर बारींत उभीराहून पुत्र शरीर फार

सुंदर सुकुमार पाहून याशरीराचा नाशहोईल हें मनांत आणून फार दुःख करिती जहाली आणि नेत्राश्रु वहाते जहाले. ते अश्रु राजशरीरावर अकस्मात पडते जहाले. त्याकाली विस्मय करून बोलतो. मेघावांचून बिंदू कोठून पडला? तेव्हां वर दृष्टिकरून पहातो तों माता फार दुःखित अशी पाहून मगतिच्या जवळ येऊन तुला येवढा खेद कां होता जहाला? कीं तुला दुष्टवचन कोणा बोलिला किंवा दुजाभेद घरामध्यें जहाला? मजनकळे माते. तरि याचें कारण काय असेल तें बोलावें.

तीस दया येऊन पुत्रा तुझा मूर्तिमदन-पाहून मला खेद मोठा जहाला. कां तरि तुझें शरीर नाशानें पावेल हें मनांत जाणून दुःख जहालें. हे पुत्रा तुझापिता त्रैलोक्य चंदकाळानें ग्रासिला यास्तव मला हाधाक मोठा पडला. धन, पुत्र, स्त्री हें सर्व शाश्वत नाहीं. आण

हे असाभासमात्र आहे. जैसें मृगजळ मिथ्या आहे तैसें हें सर्व मनांत विचार करून पहा.

असें गोपीचंद ऐकून हास्य करून बोलतो. असा सिद्ध पुरुष कोणीही मला दिसत नाहीं.

हें पुत्राचें वचन ऐकून कायबोलत्ये अरे बापा जालंदर जालंदर, या नामाचा सिद्ध पुरूष तो तुला निष्पाप करून अमर करील. असें माझ्या मनांत होतें कीं, तो सदय आहे त्याचें सद्भावें पूजन करून तुजला अमर करावें परंतु तो कोठें आहे हें मजला ठाऊक नाहीं. ज्या दिवशीं हे पुत्रा तूं गृहास योगी आणिलास त्या दिवसापासून मला त्याचे चरण अंतरले; हे महा पाप्या!

हें जननीचें भाषण ऐकून गोपीचंद उगाच रहाता जहाला तरि कां उगाच रहाता झाला. आपण गुरूला कूपांत टाकिला आहे यास्तव.

त्या काळीं मैनावती नाथातें आठऊन बहूत शोक करिती जहाली.

म

इकडे काय जहालें. जालंदर यांचा शिष्य गुरूच्या शोधना विषयीं मनांत विचार करिता जाहाला.

कानीफ यानामें करून शिष्य जालंदर यांचा. तो शिष्यासहवर्तमान गुरूचा शोध करिता जाहाला. देशो देशांत फिरूं लागला परंतु कोठेंही शोध लागला नाहीं.

त्या काळीं कानिफास गोरखनाथाची भेट जहाली. त्याणें विनोदें करून सर्व आश्चर्यकारक जें वृत्त झालें तें सांगितलें.

गोपीचंद राजा यानें तुझा गुरू कूपांत घालून तो कूप घोडयाचे लिदेनें भरून टाकिलाआहे, आतां त्याच्या रूपीं रुची राहिली नाहीं.

असें वाक्य त्याचें कानीफ सिद्ध यानें श्रवण करून तो बोलिला कीं तुझा गुरू स्त्रीराज्यांत रहातो हा कोण योगी?

असा विनोद दोघांचा होऊन मग गोरख

नाथ याणें नमन कानीफ यास करून मच्छिंदर याचा शोध करण्यास निघता जहाला, नंतर कानीफ ही निघाला. नंतर बंगाळाख्य देश याख्यानीं सातशें शिष्यां सह वर्तमान कानीफ पुष्प वाटिका म्हणजे पुष्प बागेंत राहाता जहाला.

इतिश्रीगोपीचंदआख्यानेंद्वितीयोध्यायः

---

नंतर त्या नगरींत आपले दोघे शिष्य पाठऊन राजमातेला आपलें येणें जहालें हें कळविता जहाला. ते जाऊन काय सांगते जहाले. हे माते, कानीफ शिष्यां सह वर्तमान आला.

हें ऐकून तिला बहुत हर्ष जहाला तो कसा कीं, मोठा भेटीचा लाभ जहाला असें मानिती जहाली. तेव्हां सख्यां सह वर्तमान गुरु बंधूच्या दर्शना करितां ती येती जहाली. आणि गुरू बंधूस प्रेमानें नमस्कार करून बसती जहाली. मग ती त्याला भेटून गुरूच्या वियोगामुळें अ-

त्यंत दुःखीत जहाली. त्यानंतर बोलत्ये कीं गुरूचा शोध लागला असेल ती गोष्ट सांग.

तेव्हां कानीफ बोलता जहाला. हे भगिनी आतां तूं धीर धर, आजपासून आठवे दिवशीं गुरुभेट तुला मातें होईल.

आपल्या गुरूंची भेट लवकरच होईल असें वचन ऐकून त्याच्या पदीं नमन करून आज्ञा घेऊन घरीं येत्ये समयीं मैनावतीच्या मनांत असें आलें कीं, कानीफ याचा उपदेश माझ्या पुत्रास देऊन संसार समुद्रांतून मुक्त करावा. जालंदरा प्रमाणेच साधू आहे, ज्यानें माझा संताप लवकरच दूर केला तरि निजूनच रहावें. निजणारास संताप कधींही होत नाहीं.

असें मैनावतीनें चिंतून मोठ्या त्वरेनें घरीं येऊन मग पुत्रास सांगती जहाली, त्याचा मोह दूर व्हावा याकरितां बहूत प्रकारें बोध करिती जाहाली. हे पुत्रा बागेमध्यें माझा गुरु

चा शिष्य कानीफ आला हें तुला कांहींच ठाऊक नाहीं तरि मला असें वाटतें कीं, अरे पुत्रा तुला विषय मोह जहाला आहे. बा पुत्रा विषय सेवन जिवास फार गोड वाटतो परंतु परिणामी बहुत दुःख देणारें विषय सुख आहे, याकरितां कानीफ सिद्धास आनंदानें शरण जा म्हणजे संसार समुद्रापासून तुला तारण तारितील.

असें मातेचें वाक्य श्रवण करून सैन्या सहवर्तमान पुष्पवागेंत घेऊन साच्या चरणीं मस्तक ठेविता जाहाला आणि प्रार्थना करितो कीं, हे सद्गुरो मी अनाथ आहें माझें संरक्षण करावें.

हे राजा! तूं अयोग्य कर्म केलेंस. हे महा पाप्या! माझ्या गुरूस कूपांत लोटिलास हें तुझें कर्म महा पापास कारण आहे, हे राजा! सत्पुरुषाचा छळ केलास याहून दुसरें-

महां पापनाहीं तरि पातक हरायास योगघ्यावा असा मनांत निश्चय करून सर्व संग त्याग कर म्हणजे योगाभ्यासा विषयीं योग्य होशील. असें जर राजा तूं नकरशील तर तुला नरक प्राप्तीच होईल. तूं म्हणशील कीं, मला कोणीया पापा पासून सोडवील? तर मला कोणी ही सोडविणारा दिसत नाहीं. बाराशें स्त्रियांचा पती मी असा जो यास अन्य सोळाशें स्त्रिया या कोणीही तुझ्या उपयोगास पडणार नाहींत. परिणामी काळाचे मुखीं पडशील त्या वेळीं तुला ह्या सर्वपसारा जो तो व्यर्थ असें वाटेल. अरे हे महांपाप्या! तुझा काळ जवळच आला आहे हें जाणून नाथाचा शोध करना हींतर पापाचा उपभोग करशील.

मग हें सर्व भाषण कानिफानें ऐकून मनांत भयाभीत होऊन विचार करितो इतक्यांत मैनावती आली तेव्हां कानीफपुत्रानें तें

कृत्य केलें तें तिच्या कर्णविवरीं सांगताजह्याला- त्वतसह्वासें यानें मनीं क्रोधयुक्त होऊन नाथाला घरीं आणिला आणि कूपांत याणें टाकिला- तरि तो याचें भस्म करील-

असें तो क्रोधानें बोलिला तेव्हांतीत्याच्या शांतवना करितां युक्ती करिती जह्याली; आदीं त्याची प्रेमयुक्त पूजा करून मग पुत्रास ह्यवर्तमान विनंती करिती जह्याली- आम्हीं अति अपराधी आह्मों तरी आतां तूं बाया दयाकर- कां म्हणशील तर साधुच्छळ हें महापाप आह्मास ग्रासील या करितां दया करावी- असें दोघांनीं बोलून त्याच्या चरणीं नमस्कार केला- मगतीं काय बोलतीं जह्याली- आमच्या प्रागध्यानें तुमचें आगमन येथें जह्यालें- मग तेथून त्यास आपल्या गृहास अति प्रीतीनें आणून त्याचें पूजन करून असें बोलता जह्याला कीं मजसें संरक्षण कर-

त्याचें दीन वाक्य ऐकून त्याजवळ बोल तो कीं, जेथें गुरुराय आहे तो कूप पहिल्यानें उकर.

त्याचें वचन ऐकून कानिफा सहवर्तमान कूपजवळ येता जाहाला मग सेवकांकडून लीद उकरून कूप मोकळा केला. तेव्हां सर्व गुरूस ध्यानस्थ पहाते जह्याले. कसा पहाते झाले ? सदां सार्वकाळ अढळ आणि आनंदयुक्त अवलोकिला.

मग राजाचें रक्षण करण्याकरितां दयायुक्त होऊन त्यानें युक्ती योजिली ती कशी तर लोखंड तांबें पितळ व रूपें या चार धातूंच्या चार मूर्ती करविल्या. नंतर लोह मूर्ती कूपावर ठेऊन कूपाजवळ उभाराहून गुरूस नमस्कार कर.

असें कानीफाचें वाक्य ऐकून राजानें तसें केलें.

मग गुरू बोलतो. अरे तूं कोण ? हें ऐकू

न बोलतो मी राजा तुझ्यापदीं नम्र आहें.

हें वाक्य श्रवण करून तुझें भस्म होवो. असें त्यास बोलता जहाला, त्याकाळीं लोह मूर्ती आयास नलागतां जळती जहाली. अशाच ती न मूर्ती तीव्र गुरुशापानें दग्ध होत्या जहाल्या, नंतर राजा हें पाहून आपल्यामनीं भीती धरून थरथरां कांपता जहाला.

त्यावेळीं कानीफ बोलतो कीं राजा कूपा वर जाऊन कांहीं मनांत भीती न धरितां हे गुरो तुझ्या चरणीं माझा नमस्कार असो असेंबोल.

हें ऐकून राजानें तसेंच केलें त्याकाली गुरु विस्मित होऊन बोलतो. अजून तूं आहेस? तरि तुझी काया अमर होवो.

मग गोपीचंदानें नाथास कूपा बाहेर काढिला त्यावेळीं कानीफ गुरूच्या चरणीं मस्त क ठेऊन भेटता जहाला.

त्यानंतर राजानें नमस्कार करून आपल्या गृहास त्यांस नेता जहाला. मग आपल्या सिंहासनीं बसवून भक्तीनें त्यांचें पूजन करिता जहाला.

मग राजानें स्तवन करून गुरुचरणधूळी आदरें करून आपल्या मस्तकीं ठेविली, त्यावेळीं महाबंदीनपाडणारे असे जे सर्वविषय त्यांस विसरता जहाला. त्या समयीं राजाच्या मनांत सद्भाव प्रगट जहाला तो काय? तरि नाथासच गुरू करावा ह्मणजे संसार संबंधीं दुःख दूर होईल.

त्यानंतर बहुत हर्षानें गुरूच्या समीप येऊन राजमाता पहिल्यानें नाथाचे पाय धरून स्तविती जहाली. मग पूजन करून वारंवार भेटून काय बोलते? देवा फार दिवस तुह्मासेवा अंतरली.

इतिश्रीगोपीचंदआख्यानेतृतीयोध्यायः

राजानें अति नम्रत्व स्वीकारून काय बो लला नाथाप्रत मी पतित अति पापी आहे, माझें संरक्षण करावें. तुझ्या दर्शनमात्रें मला असें वाटतें कीं, संसार हा सर्व मिथ्या आहे, या करितां तुजपासून उपदेश घ्यावा असें मनीं वाटतें तरि माझे सर्व अपराध क्षमा करून उत्तम प्रकारच्या माझे मनीं सूपदेश होई असा उपदेश द्यावा अ सें बोलून नाथाचे चरणीं आपलें मस्तक ठेऊन मग विनंती करितो कीं, दीन असा जो मी याव र उशीर न लावितां दया करावी.

त्याकाळीं मैनावती बोलते कीं, पुत्रास ध न्य करावा. कसा तर तुझे चरणीं नम्र झाला या चा श्रम दूर करावा.

मग गुरू बोलतो कीं, दुर्घट योग तुला क सा घडेल जे साधक जन ते अभ्यास हाच कोणी एक यायाग स्यावर देह झिजवितात. या स्तव योग कठीण हें जाणून विवेककर मग ते

थील दुःखपाहून भोगीं रमसील ही गोष्ट बरी नाहीं. तूं ह्मणसील माझा दृढ निश्चय आहे तर भोग माझें काय करितील तरि दृढ निश्चय झालासही लवकरच विषय वश्य करितील. या विषयाचा तुजला फार अभ्यास आहे, तरि तूं वैराग्या विषयीं निश्चय करूं नको. कां तरि त्या दुःखानें वैराग्य सिद्ध होणार नाहीं.

हें ऐकून राजा बोलतो कीं, माझें मन विषय रूखास आसलें याविषयीं तूं जाणतोस.

तें राजाचें निश्चय वाक्य श्रवण करून गुरू दयायुक्त होऊन योगोपदेश करून चरणी नम्र यास संतोषविता जहाला.

गुरूपदेशें करून तत्क्षणी ब्रम्हानुभव होऊन त्याच्या मनांत विषयाचा त्रास आला, मग मोठ्या आदरें करून मुद्रा, कुबडी, कमंडलु आणि कंथा हीं घेऊन गुरूचा जो परंपरा मार्ग त्यास, स्वीकारिता जाहाला.

तें पाहून नाथ बोलतो कीं, योगाची जा गा जागीव तरि आपल्ये मातेची आज्ञा घेऊन ये. आह्मीं कानीफा सहवर्तमान स्वच्छंद गम नार्थ जातों तरि आज्ञा घेऊन लवकर अभ्यासा करितां तूंही ये.

हें ऐकून मातेजवळ येऊन नमस्कार करि ता जहाला; मग बोलतो कीं, गुरुसहवर्तमान- जाण्यास मला आज्ञा द्यावी.

तें पुत्राचें वचन ऐकून तिला फार आनंद होता जहाला, कांतरि विषय फार पीडाकारक आहे याकरितां बुद्धिवान् यांस विषय त्याग हा च योग्य आहे असें मनीं आणून आज्ञा देती जहाली.

मग आज्ञा घेऊन लवकर गुरूसहवर्त मान योग धारण करण्याकरितां निघता जहा ला. बहुत देश बहुत तीर्थें पाहून त्या उद्योगा स[illegible]ग लागता जहाला.

मग बारावर्षे जह्याल्या नंतर गोपीचंद या स गुरू बोलतो कीं, तुझा परिपूर्ण योग जह्याला तरी तूं आतां स्वदेश पहा. असें कां ह्मणसील तर जन्म भूमी हें मोठें तीर्थ आहे तरि तेथें जाऊन मातेचें दर्शन घेऊन यावें.

असी गुरूची आज्ञा मान्य करून लवकर आपल्या देशास जाऊन आपले नगरांत येऊन मातेच्या दर्शनाची इच्छा करिता जह्याला.

इतिश्रीगोपीचंदआख्यानेंचतुर्थोध्याय:

नंतर मैनावती आपल्ये सखीजवळ बोलते कीं, गुरूस जाऊन फारदिवस जह्याले याकरितां मला खेद फार वाटतो.

तें वचन सखी ऐकून बोलते कीं, हे स्वामिनीं आपल्या नगरांत एक योगीआला आहे तो फिरत फिरत आपल्ये गृहास येईल.

इतक्यांत तो घराच्या आंगण्यांत आला.

हें दूतानीं पाहून मैनावतीजवळ जाऊन सांगितलें.

हें दूताचें वचन ऐकून बाहेर येऊन त्यास पहातीं जहाली, आणि त्यास पुसते कीं, योगोपदेश तुह्मास कोठें कोणापासून प्राप्त जहाला?

हें ऐकून तिला नमस्कार करून साधू बोलतो कीं तूं माझी माता आहेस. माझें येणें जहालें याचें कारण तुला आतां सांगतों. मला गुरूची आज्ञा अशी जहाली कीं, जन्मस्थान हें तीर्थ आहे ह्मणून मी येथें आलों, परंतु गुरूचा वियोग मला फार पीडा करितो.

त्याकालीं मैनावती बोलते कीं, माझा पुत्र तूं आतां फार शोभायमान दिसतोस; तूं आपल्या देहाचें योगाभ्यासानें सार्थक केलेंस जालंदर नाथ यांच्या कृपेनें मातेला नमस्कार करून आज्ञा घेऊन स्त्री गृहास जाऊन त्यांप्रत ह्मणतों कीं या, आणि मला भिक्षा घा. तुमच्या देहाचें-

नाथ रक्षण करील.

तें सुंदर राजवचन आपल्या पती सार खें ऐकून त्या चतुर स्त्रिया बाहेर धांवत येऊन त्याला ओळखून हाच आमचा पती असें बोलत्यां जहाल्या.

मग त्यास विनंती करितात कीं, विषयसुख टाकून वैराग्य कां वरिलेंत आणि आम्हास विरही कां त्यजिलेंत.१ हे राजा स्त्रीचा त्याग करणें हें अयोग्य आहे. कां तर आह्मास तूंच सार, जसें मत्स्यांस उदकजीवन तसाच तूं आह्मास आहेस. याकरितां आम्हा सर्वांस तूं ज्ञानोपदेश कर म्हणजे आम्हीं सर्व जणीं तुझा बरोबर येतों, कां म्हणाल तर तुमचा वियोग आह्मास सहन होत नाहीं.

तो स्त्रियांस बोलतो कीं, मी योगी आहें. राजा नव्हे हें बोलतांच कोणी वस्त्र धरून बसा असें बोलत्या जहाल्या.

तो त्या स्त्रियांस ह्मणतो. मजविषयीं ममता टाकून वस्त्र सोडावें कीं, तुमच्या प्रीतीस्तव योग मी सोडूं कीं काय? कधीं सोडणार नाहीं.

इतिश्रीगोपीचंद्र आख्यानें पंचमोध्याय:

त्याकाळीं स्त्रिया पुनः त्याचें वस्त्र सोडूंव ह्मणता नकीं, राज्य कर, आम्हास टाकून जाऊन विरहाग्नीमध्यें तुपासारिखा जळूं नको. असें जर मनात नसेल तर येथें सुंदर गृह बांधून देतों त्यांत योगसाधून रहावें, बाहेर दुःख तुम्हास होईल, अनुकूळ कांहीं होणार नाहींश य्या वस्त्रही आणि कोणी गोष्टी बोलण्यासही मिळणार नाहीं.

तो वैराग्य पर्वत बोलतो कीं, तृणासह वर्तमानजी भूमी ती शय्या आणि वस्त्र आकाश, हीं मला आहेत. मित्र कोण असें ह्मणाल तर गुरुनाथ आहे, ज्याणें मला उपदेशरूप मार्ग दाखवून शांतवन केलें तो माझा मित्र आहे.

त्या स्त्रिया पुन्हा राजाला असें म्हणतातकीं, तुमचे पाय कोण धुवील? आणि दूधभात कोण देईल?

स्त्रियांस बोलतोकीं गंगादि तीर्थे माझे चरण धुतील. आणि मला सर्वगृहीं माता दूधभात देतील.

नंतर स्त्रिया म्हणतातकीं, पलंगावर निद्रा कोण करील? आणि स्नरस गोष्टी कोणासीं कराल तें सांगा.

तो बोलतो कीं माझे शय्येवर काठी निजेल. वेणूआदिक वाद्यांबराबर मी गोष्टी करीन, तुम्ही कशी होऊंनका.

मग त्या बोलतातकीं, सिंहासन, स्त्रियाभोग, घर, मित्र इत्यादिक कांहीं मिळणार नाहीं, असा हा योग दुःखदायक आहे.

तो ज्ञानसूर्य काय बोलतो. मला सिंहासन हरिणाचें चर्म आहे. जो स्त्रीभोग यापेक्षां ब्रह्मानंदानुभव मला अधीक आहे. आनंद हें माझें गृह, सर्वजन हे माझे मित्र, योग हा माझें सौख्य; विषयरसाहून अधीक स्नखकारक, भवरोगासहरण करणारा योग आहे. हें बोलून निघाला तेव्हां त्यास्त्रिया त्याची कथा पुः

धरित्या जह्याल्या. त्यावेळीं तो बोलतो कीं, माझीकंथा तुह्मीं सोडा असें कां म्हणाल तर गुरूनें मला चांगल्या पंथास लाविलें आहे.

इतिश्रीगोपीचंदआख्यानेंषष्ठोध्यायः

नंतर त्यांच्या हांतांतील कंथा ओढून निघता जहाला. असें कां तर तो योगी पुन्हः विषयातें न भोगी. उत्तम योगासाठीं स्त्रियांचा त्याग करून मातृदर्शनास जाता जहाला. मातृगृहीं जाऊन तिला बोलतो कीं, हे निर्येगि मलाजावयास आज्ञा दे. कां ह्मणशील तर गुरू माझी वाटपहात आहे ह्मणून मी मोक्षासाठीं जातों.

हें पुत्राचें वचन ऐकून तीकायबोलते. जर तुला गुरूप्रीति अत्यंत आहे तर जा. असें कां ह्मटलें तर योगाची रीती अशीच आहे, तरि तूं चंपावतीच्या नगरांत सहसा गमन करूनको. असें कां ह्मणशील तर ती प्रेम वल्ली आहे ह्मणून तिला माझें

मन भिनें.

आज्ञा असें म्हणून तो परदेशास निघाला. मग फिरतां फिरतां भगिनीची भेट घेण्याची आशा उत्पन्न होती जहाली. मग तो या भद्रावती नगरींत भिक्षे करितां आणि भगिनीचा प्रेमा पहाण्या करितां जाता जहाला.

त्या काळीं ती आपल्या बंधूचा शोध कोठें लागेल म्हणून इछीत असे. चंपावतीजीचें नाव तीच्या सख्या बोलतात कीं, हे बाई कोणी साधू आपल्या नगरांत आला आहे तो भिक्षेस्तव लोकांच्या घरीं फिरतो. असें सख्यांचें वचन ऐकून त्याना बोलते कीं, तुम्ही लवकर जाऊन त्याला आणा. कशा करितां. माझ्या बंधूच्या खुणा पुसण्या करितां.

तीची आज्ञा ऐकून सख्या जेथें साधु राहात होता तेथें जात्या जहाल्या आणि त्याला नमस्कार करून बोलतात कीं. तुह्मास राजस्त्री बलाविते. आपण चलावें.

ही सख्यांची प्रार्थना ऐकून भगिनीचे गृहास
जाता जहाला. मग चंपावतीनें पाहिल्याबराबर प्रे
मानें सद्गदित होती जहाली. ती हस्त जोडून बोल
ते कीं, माझा बंधु पाहिलात काय? तो तुमचा स
खा असें कांतर ज्यायों आपला देह योगांत वस
विला.

तदनंतर साधु बोलतो कीं, मी तुझा बंधु मला
तूं ओळखिलेंस? नाहीं काय. नंतर ती बोलते कीं,
मी पुसतें तें मला सांग.

तुझा देश कोण? खंड कोणतें? माता कोण?
पिता कोण? हें सर्व सत्य बोल आणि योगग्रहणा
चें कारण सांगून माझ्या तापातें दूर कर.

मग बोलतो कीं, माझा बंगाल देश, उत्तर खं
ड, त्रैलोक्यचंद हा माझा पिता, हें मनांत जाण, मा
झी माता मैनावती आणि गोपीचंद हें माझें ना
म, मी दुःखद असा जो काम त्याचा त्याग करून
सुख देणारा जो योग तो साध्य केला.

हें त्याचें भाषण ऐकून चंपा त्याची कंथा धरिती जहाली. आणि त्याप्रत बोलते कीं, हें रा ज्य तुझेंच आहे. हा पंथ तूं सोड.

तो साधू चंपावती प्रत बोलतो कीं, माझें व स्त्र सोड. ज्याला ज्ञानामृत मिळालें त्याला पुनः विषय गोडी लागणार नाहीं. तुला संसारांत ब हुत सुख आहे असें वाटतें परंतु हा संसार ब हुत दुःखदायक आहे, ज्या योगाच्या सेवनें क रून या देहास काळही भितो. हा संसार सर्व मिथ्या आहे, याकरितांच महादेवानें सर्वत्या ग करून स्मशानीं रहातो. याकरितां हे भगि नी मी राजा नाहीं माझी कंथा सोड तूं मला आज्ञा दे मी गुरुदर्शनाकरितां जातों.

असा त्याचा निश्चय पाहून तत्क्षणीं व स्त्र सोडिती जहाली.

मग तीज प्रत बोलतो कीं, मी जातों परंतु माझा वियोग न मानतां तुम्हीं स्वस्थ असा.

त्यानंतर तो योगी प्रेमे करून गुरूकडेस जाता जहाला.

मग नाथासमीप येऊन गुरूला नमस्कार करिता जहाला.

ज्याकाळीं गुरूनें आलिंगिला तेव्हांच तो ब्रम्हानंदीं लीन होता जहाला. त्या काळीं गुरूच्या मनांत असें आलें कीं, याच्ये मनांत स्त्रियांसंमधीं काम आला नाहीं.

असें अतिसुखकारक गोपीचंदास आलिंगन जहाल्या बराबर असें त्याच्या मनांत आलें कीं, निरंतर गुरूजवळ रहावें असें मनांत येऊन मी तुमच्या जवळ राहावयास इच्छितों असें बोलता जहाला.

असें शिष्याचें वचन ऐकून नाथ बोलतो कीं, तुला माझा वियोग कधीं नाहीं. मी सर्वत्र आहें यास्तव तूं मद्वियोग संमधीं दुःख मानूं नको.

इतिश्रीगोपिचंद्आख्यानेंसप्तमोध्याय:

समाप्त

हें पुस्तक छापण्याचा अधिकार
मालकानें आपणाकडे ठेविला
आहे.